# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.आयुक्त तथा प्रशासक
नगरसचिव कार्यालय

---

## प्रशासकीय महासभा क्रमांक २३

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सर्वसाधारण महासभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **शुक्रवार दिनांक १२/०९/२०२५ दुपारी ४-०० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्यांचे नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करुणा डहाळे | अति.आयुक्त |
| ३. | श्री हेमंत निकम | उपायुक्त |
| ४. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ५. | श्रीमती स्वालिया मालगावे | करमुल्य निर्धारण तथा कर संलकन अधिकारी |
| ६. | श्री किशोर सुडके | सहा. आयुक्त |
| ७. | श्री शाहेद शेख मो. शेख | मुख्य लेखापरीक्षक |
| ८. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| ९. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| १०. | श्रीमती वर्षा घुगरी | कार्य. अभियंता बांधकाम |
| ११. | श्रीमती संपदा कुलकर्णी | प्र.आरोग्याधिकारी |
| १२. | श्री चंद्रकांत मोरे | लेखा विभाग |
| १३. | श्री राजेंद्र माईनकर | प्र. भांडारपाल |
| १४. | श्री के.डी साबळे | लिपीक आस्थापना विभाग |
| १५. | श्री.लक्ष्मण पाटील | प्र.सहा.आरोग्याधिकारी |
| १६. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १७. | श्री प्रदीप चव्हाण | उप अभियंता, बांधकाम |
| १८. | श्री गितेश सोनार | कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग |
| १९. | श्री प्रकाश सोनवणे | उप अभियंता नगररचना |
| २०. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभियंता नगररचना |
| २१. | श्री हेमंत पावटे | सहा. अभियंता बांधकाम |
| २२. | श्री मधुकर निकुंभे | मालमत्ता व कर विभाग |
| २३. | श्री रविकिरण पाटकरी | वृक्ष समिती प्रमुख |
| २४. | श्री दुष्यंत महाजन | सहा. अग्निशमन अधिकारी |
| २५. | श्री प्रसाद जाधव | अतिक्रमण अधिक्षक |
| २६. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |

मा.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-१८७ | ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रमा अंतर्गत धुळे शहराच्या विकास कामांचे प्रस्ताव सादर करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे. |
| मा.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| मा.उप अभियंता | ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत पत्रानुसार १ ते १० कामे प्रस्तावित होती. सदर कामांची प्रत्यक्ष पहाणी करुन तांत्रिक मंजुरी घेण्यात आलेली आहे. सदरचा प्रस्ताव एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धुळे यांच्याकडे सादर करणेस व त्यांच्या मार्फत शिफारस होवुन मा. जिल्हाधिकारी धुळे यांच्याकडे आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेकामी सादर करणेस महासभेची मंजुरीस्तव सादर करणेत आला आहे. |
| मा.आयुक्त तथा प्रशासक | कधीपर्यत पाठवायचे आहेत? प्रस्ताव कोणाकडुन आले आहेत? तसेच कुठल्या एरियातील आहे? |
| मा.उपअभियंता | ही कामे आमदार महोदयांमार्फत आलेली आहेत. आरक्षीत वार्डातील कामे आहेत. |
| मा.आयुक्त तथा प्रशासक | सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. |

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १८७ दिनांक १२/०९/२०२५**

ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रमा अंतर्गत पत्रानुसार १ ते १० विकास कामे प्रस्तावित आहे. त्यानुसार ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रमा अंतर्गत २०२५-२६ साठी आरक्षित प्रभागातील १ ते १० कामांचे प्रस्ताव तयार करण्यात आले असून तांत्रिक मंजुरीसह अंदाजपत्रकासोबत देखभाल दुरुस्तीचे हमीपत्र , व इतर अत्यावश्यक दाखले व प्रमाणपत्रासह परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्र. ६ येथे आदिवासी वस्तीतील मोराणे येथील बाबाजी महाराज मंदिर जवळ , नाना कोळी यांच्या घराजवळ , महादेव मंदिर जवळ सोलर हायमास्ट बसविणे | ९,९७,७१७/- |
| २. | प्रभाग क्र. १४ येथे आदिवासी वस्तीत जमनागिरी गेट जवळ , शास्त्री नगर जवळ , दक्षिण मुखी बजरंग बली मंदिर जवळ सोलर हायमास्ट बसविणे | ९,९७,७१७/- |
| ३. | प्रभाग क्र. १५ येथे आदिवासी वस्तीत कालिका देवी नगर येथे , आदिवासी समाज अमरधाम येथे व जमानागिरी जवळ सोलर हायमास्ट बसविणे | ९,९७,७१७/- |
| ४. | प्रभाग क्र. १६ येथे आदिवासी वस्तीत सर्वे नं. ५६९, अण्णा ठाकरे यांच्या घराजवळ , शनेश्वर मंडळ चौक जवळ सोलर हायमास्ट बसविणे | ९,९७,७१७/- |
| ५. | प्रभाग क्र. ०६ मधील पारधी समाज आदिवासी वस्तीतील महादेव मंदिर जवळ पेव्हर ब्लॉक बसविणे | ९,९८,१५१/- |
| ६. | प्रभाग क्र.१४ मधील आदिवासी वस्ती येथील शनी मंदिर जवळ पेव्हर ब्लॉक बसविणे | ९,९७,४६१/- |
| ७. | प्रभाग क्र. १५ मधील आदिवासी वस्ती मधील दफन भूमी येथे पेव्हर ब्लॉक बसविणे | ९,९६,७७१/- |
| ८. | प्रभाग क्र. १६ येथील आदिवासी वस्ती मधील शिवानंद मित्र मंडळ , चितोड वेडू माता चाळ येथे पेव्हर ब्लॉक बसविणे | ९,९९,९२१/- |
| ९. | प्रभाग क्र. १५ येथे आदिवासी वस्तीत जय बजरंग चौक येथे , गौरव प्रोव्हिजन जवळ, शनी नगर चक्की जवळ येथे सोलर हायमास्ट बसविणे | ९,९७,७१७/- |
| १०. | प्रभाग क्र. १६ येथे चितोड मधील आदिवासी वस्तीत जय शिवानंद चौक येथे , दर्ग्या जवळ , वेडू आप्पा चाळ येथे सोलर हायमास्ट बसविणे | ९,९७,७१७/- |
| | **एकूण** | **रु.९९,७८,६०६/-** |

उक्त अ.क्र. १ ते १० अनुसूचित जमातीच्या प्रभागातील कामे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रमा अंतर्गत प्रस्तावित करणेस मान्यता देण्यात येत आहे. तात्काळ प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांच्याकडेस सादर करण्यात यावा. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१८८ — सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या नियतव्ययानुसार कामांची निश्चिती करण्यासाठी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता — सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत शासनाने दिलेल्या नियतव्ययनुसार सदरचा प्रस्ताव तांत्रिक मंजुरी घेवुन जिल्हा नियोजन समितीने निर्गमीत केलेल्या विहित मर्यादेत प्रस्ताव तयार करणेकामी कामांची निश्चीती होवुन ठराव पारीत करणे तसेच सदर योजनेच्या कामांसाठी भरावयाच्या स्वहिस्स्यास मान्यता देणेकामी सदरचा विषय मे. महासभेपुढे सादर करण्यात आला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — कोणती कामे घेणार आहोत यात?

मा.उपअभियंता — नवरंग जलकुंभ येथे कर्मशिअल कॉम्प्लेक्स व भाजी मंडई घेणार आहोत व पांझरा नदिकिनारी टॉय ट्रेन व ही कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येईल्.

मा.आयुक्त तथा प्रशासक — यात इंम्पलीमेंटींग एजन्सी सार्वजनिक बांधकाम विभाग असु शकते का ? यात जीआर काय सांगतो? तपासून घ्यावे. हे झालं आमदार महोदयांच्या पत्राप्रमाणे तसेच पालकमंत्री महोदयांकडील यादी आली का?

मा.उपअभियंता — हो दलितवस्ती व दलीतेतरची कामांची यादी आली आहे. ग्रामीणचे आमदार यांच्याकडुन नगरोत्थानची यादी आली आहे. उक्त कामांमधील एकविरादेवी मंदीराजवळ रिव्हर फ्रंट उभारणे व नदी किनारी टॉयट्रेन उभारणे या कामांची कार्यान्वित यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग धुळे राहिल. तसेच सदर कामांबाबत आवश्यक असणारी परवानगी तथा नाहरकत दाखला संबंधित विभागांकडून घेण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची राहील.या अटी शर्तीवर सदर काम प्रसतावित करावे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १८८ दिनांक १२/०९/२०२५**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र सुवर्ण नगरोत्थान योजना अंतर्गत प्रारूप आराखड्यात समाविष्ट असलेल्या कामांचे परिपूर्ण प्रस्ताव आवश्यक तांत्रिक मान्यता व अनुषंगिक परवानग्यासह सादर करणे बाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.

उक्त अहवालानुसार धुळे महानगरपालिका क्षेत्रात जिल्हा स्तरीय नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी खालील कामे उपलब्ध नियतव्ययानुसार प्राधान्यक्रमाने निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १. | देवपूर भागांतील स.नं.28/2 येथील मनपा मालकीच्या आरक्षित जागेवर कर्मशियल कॉम्प्लेक्स व भाजी मंडईचे बांधकाम करणे. (भाग 1) | १० कोटी |
| २. | देवपूर भागांतील स.नं.28/2 येथील मनपा मालकीच्या आरक्षित | ५ कोटी |

| | | |
|---|---|---|
| | जागेवर कमर्शियल कॉम्प्लेक्सचे बांधकाम करणे. (भाग 2) | |
| ३. | धुळे शहरात नदीकाठ विकासभाग म्हणुन पांझरा नदी किनारी एकविरा देवी मंदिरासमोर पादचारी पुलाचे बांधकाम करणे. | १० कोटी |
| ४. | एकविरा देवी मंदिर जवळील स्मशानभूमि व समोरील घाट विकसित करणे. | ४.५ कोटी |
| ५. | दसेरा मैदान जलकुंभाच्या बाजूच्या नाल्यास संरक्षण भिंत बांधणे. | १.७० कोटी |
| ६. | कै.युवराज आण्णा यांच्या घराजवळील गो शाळेच्या भिंती लगतच्या नाल्यास संरक्षण भिंत व स्लॅब कल्व्हर्ट करणे. | ८० लक्ष |
| ७. | पिंपरी उपनगर येथे सामाजिक सभागृह बांधणे. | ३० लक्ष |
| ८. | वाडीभोकर राजाराम नगर अंतर्गत रस्ता कॉंक्रीट करणे | २० लक्ष |
| ९. | वलवाडी इंद्रप्रस्थ कॉलनी येथील खुल्या जागेत सभागृह बांधणे. | ५० लक्ष |
| १०. | चितोड येथील पाटील समाज अमरधाम मध्ये दोन युनिट (ओटे) बांधणे. | २५ लक्ष |
| ११. | चितोड येथील गवळी समाज अमरधाम कडे जाणारा रस्त्यावर पाईप मोरी करणे. | २५ लक्ष |
| १२. | महिंदळे आदिवासी समाज दफनभूमी येथे आवर भिंत बांधणे. | २५ लक्ष |
| १३. | वलवाडी आदिवासी दफनभूमी येथे आवर भिंत व बैठक व्यवस्था बांधणे | २५ लक्ष |
| १४. | अवधान येथील गट नं.8/1,8/2 मधील खुल्या जागेत सभागृह बांधणे. | ८० लक्ष |
| १५. | इंदिरा नगर भैय्या दुसाने यांच्या घरापासून ते पपू वाणी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे | २० लक्ष |
| १६. | देवपूर भागांतील गीता नगर येथील नाल्याला संरक्षण भिंत बांधणे. | ५० लक्ष |

उक्त अ.क्र. १ ते १६ शहरातील सर्व प्रभागातील सर्वसमावेशक व अत्यआवश्यक कामे प्राधान्यक्रमाने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत प्रस्तावित करणेस मान्यता देण्यात येत आहे. व यासाठी लागणारा आवश्यक तो मनपा हिस्सा अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे. तात्काळ प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांच्याकडेस सादर करण्यात यावा.

उक्त कामांमधील अनुक्रमांक ३ व ४ मधील नमूद कामांची कार्यान्वित यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग धुळे राहिल. तसेच सदर कामांबाबत आवश्यक असणारी परवानगी तथा नाहरकत दाखला संबंधित विभागांकडून घेण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची राहील.. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१८९ — सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या नियतव्ययानुसार कामांची निश्चिती करण्यासाठी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सदरचा प्रस्ताव तांत्रिक मंजुरी घेवुन जिल्हा नियोजन समितीने निर्गमित केलेल्या विहित मर्यादेत कामांची निश्चीती होवुन ठराव पारीत करणेसाठी मे. महासभेपुढे सादर करण्यात आला आहे. सदरील कामांची यादी आपल्याकडे प्राप्त झाली आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक याचा आऊटले किती आहे.

मा. उपअभियंता आपल्याला २ कोटी ७० लाख देणार आहे. मागील वर्षी १० कोटी मिळाले होते.त्यातील ३ कोटी ५४ लाख कट झाले आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १८९ दिनांक १२/०९/२०२५**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी प्रारूप आराखडा तयार करणेकामी जिल्हा नागरी दलित वस्ती योजना अंतर्गत कामाची निश्चिती करून ठराव करून मिळणेबाबत मे.महासभेपुढे विषय ठेवण्यात आलेला होता त्यानुसार प्रशासनाने याबाबत शासन निकषानुसार शहरातील प्रस्तावीत कामे करावयाची असल्याने निकष नमूद करून पुढील महासभेत प्रस्ताव सादर करणेबाबत आदेशित करण्यात आलेले आहे.त्यानुसार शासन निर्णयानुसार वरील योजनेअंतर्गत खालील क्षेत्रात कामे अनुज्ञेय राहतील.धुळे महानगरपालिका क्षेत्रात नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षांसाठी खालील कामे उपलब्ध नियतव्ययानुसार प्राधान्यक्रमाने निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १. | महाले नगर कब्रस्तान पासून ते बावलपुरी पंचायत भवन पर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे | ५० लक्ष |
| २. | टेऊराम हायस्कूल ते महाले नगर पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | १ कोटी |
| ३. | धुळे मनपा हद्दीतील वलवाडी भागातील पेट्रोल पंप ते नरेश आप्पा यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ५० लक्ष |
| ४. | रमाबाई आंबेडकर नगर भागात रस्ता कॉंक्रीट करणे. | २० लक्ष |
| ५. | नागसेन नगर भागात श्री. सुरेश कांजरेकर ते अशोक शिंदे यांचे घरापर्यंत कॉंक्रीट गटार करणे. | २० लक्ष |
| ६. | प्रभाग क्र. 16 कृषी नगर येथे ओपन स्पेस मध्ये जॉगींग ट्रॅक करणे. | १० लक्ष |
| ७. | प्रभाग क्र. 16 संबोधी नगर मध्ये रस्ता कॉंक्रीट करणे. | ३० लक्ष |
| ८. | वलवाडी भागातील पाटबंधारे कॉलनी बोर्ड ते गणेश डेअरी पर्यंत आर.सी.सी. गटार करणे | ८० लक्ष |
| ९. | प्रभाग क्र. 16 येथे राजरत्न सोसायटी येथे रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. (सर्व्हे नं. 79/1+२+३ महिंदळे शिवार) | ५० लक्ष |
| १०. | धुळे मनपा हद्दीतील वलवाडी भागात वृंदावन कॉलनी येथे श्री. खलाणे यांच्या घरासमोर कॉंक्रीट रस्ता करणे. | ४० लक्ष |
| ११. | अनमोल नगर, राजीव गांधी शाळेजवळ पश्चिम कडील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ५० लक्ष |
| १२. | इंदिरा नगर बापू चौधरी ते आप्पा महाजन घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | १५ लक्ष |
| १३. | राजाराम पाटील नगर बोर्डापासून पश्चिमेस रस्ता कॉंक्रीट करणे | ३० लक्ष |
| १४. | शकुंतला कॉलनी अश्विनी ट्रेडर्स ते झेंडा चौक रस्ता डांबरीकरण करणे | ३० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| १५. | अष्टविनायक नगर भाग २ अंतर्गत रस्ता कॉक्रीट करणे | २५ लक्ष |
| १६. | प्र.क्र.१ मध्ये वाडीभोकर रोड ते अमरधाम पर्यंत रस्ता कॉक्रीट करणे. | २५ लक्ष |
| १७. | प्र.क्र.१६ मध्ये कृषी नगर येथे रस्ता कॉक्रीट करणे. | २५ लक्ष |

उक्त अ.क्र. १ ते १७ शहरातील सर्व प्रभागातील सर्वसमावेशक व अत्यआवश्यक कामे प्राधान्यक्रमाने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्रस्तावित करणेस मान्यता देण्यात येत आहे. तात्काळ प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांच्याकडेस सादर करण्यात यावा. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१९० सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी नागरी दलितेत्तर सुधार योजना अंतर्गत अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या नियतव्ययानुसार कामांची निश्चिती करण्यासाठी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी नागरी दलितेतर योजना अंतर्गत कामांचे परिपुर्ण प्रस्ताव आवश्यक तांत्रिक मान्यता घेवुन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी महोदय यांच्याकडे प्रशासकीय मान्यतेस्तव सादर करायचे आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात कुठली कामे घेतली आहे.

मा.उपअभियंता यात मा. आमदार महोदयांचे रिव्हर फ्रंट चे काम आहे. ते देखील तपासुन घ्यावे लागेल पत्रात त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करावे असे सुचित केले आहे. उक्त कामांमधील नदी किनारी टॉयट्रेन उभारणे या कामाची कार्यान्वित यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग धुळे राहिल. तसेच सदर कामाबाबत आवश्यक असणारी परवानगी तथा नाहरकत दाखला संबंधित विभागांकडून घेण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची राहील. या अटी शर्तीवर सदर बाब प्रस्तावित करण्यात येत आहे.

मा.उपायुक्त यात नियतव्यय ६५ कोटी आहे का.

मा. उपअभियंता जिल्हा नगरोत्थान ३५.३८ आहे. दलितेतरला ८.७० व दलित वस्तीसाठी ६.४८ आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १९० दिनांक १२/०९/२०२५**

वाचा क्र.०१ व उप अभियंता, बांधकाम विभाग यांचा वाचा क्रमांक २ चा प्रस्ताव तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदी नुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी नागरी दलितेत्तर योजना अंतर्गत प्रारूप आराखड्यात समाविष्ट असलेल्या कामांचे परिपूर्ण प्रस्ताव आवश्यक तांत्रिक मान्यता व अनुषंगिक परवानग्यासह सादर करणे बाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.

उक्त प्रस्तावानुसार धुळे महानगरपालिका क्षेत्रात नागरी दलितेत्तर सुधार योजना अंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी खालील कामे उपलब्ध नियतव्ययानुसार प्राधान्यक्रमाने निश्चित करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **कामाचे नाव** | **अंदाजपत्रकीय रक्कम** |
|---|---|---|
| १ | देवपूर भागांतील आयटीआय ते पंचवटी ते छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ते दसेरा मैदान पर्यंत LT लाईन काढून भूमिगत करणे व विद्युतीकरण करणे. | २ कोटी |

| | | |
|---|---|---|
| २ | देवपूर भागांतील आग्रा रोड ते स्वामी नारायण मंदिर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ६० लक्ष |
| ३ | सिद्धेश्वर गणपती मंदिर ते स्वामी समर्थ मंद र ते मोठा पूल व झाशी राणी पुतळा ते अग्रवाल भवन पर्यंत व्हाईट टॉपिंग (कॉक्रिट)रस्ता करणे. | ५.५० कोटी |
| ४ | देवपूर भागांतील स.नं.५२ येथील उद्यानासमोर पेव्हर ब्लॉक बसविणे | ४० लक्ष |
| ५ | मोठा पूल येथे दोन्ही बाजूस विद्युत व्यवस्था करणे. | ५० लक्ष |

उक्त अत्यआवश्यक कामे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षांसाठी नागरी दलित्तेत्तर सुधार योजने अंतर्गत प्रस्तावित करणेस मान्यता देण्यात येत आहे. तात्काळ प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांच्याकडेस सादर करण्यात यावा. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१९१ मौजे सर्व्हे न. ४८९/१/ब१ चक्करबर्डी रोड येथे नव्याने बांधकाम झालेल्या मनपा मालकीच्या दवाखान्यास स्व. माजी नगरसेविका विमलादेवी ओमप्रकाश अग्रवाल नामकरण करणे तसेच सदर ठिकाणी प्रसुतीगृह व दवाखान्यासाठी साहित्य व उपकरणे खरेदी करणेकामी निधी उपलब्धेसाठी जिल्हा नियोजन मंडळाकडेस प्रस्ताव सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता धुळे मनपा हददीतील मौजे सर्व्हे नं. ४८९/१/ब १ चक्करबर्डी येथे ऑक्युमोडेशन अंतर्गत दिनांक १३ नोव्हेंबर २०२४ रोजी अभिन्यासास मंजुरी मिळाली होती.

मा.आयुक्त तथा प्रशासक धुळे येथे AR खाली डेव्हलप झालेले पहिले रिझर्व्हेशन आहे. ताबा पावती व ७/१२ याची खात्री करावी. याचा प्रस्ताव मागे केला होता. यापुर्वी ५० लाखाचा ठराव झाला होता. त्याचे काय. तो मनपा फंडातुन करणार होतो का. तो ठराव तपासुन घ्या. त्याचे इस्टीमेशन वगैरे केले आहे. तो ठराव झाला आहे ते आता डीपीडीसीकडे पाठवुन द्या. आमदार महोदयांनी पैसे मिळवुन देण्याची जबाबदारी घेतली आहे. HR चे सगळे ओर्व्हरऑल काढुन घ्या. १५ व्या वित्त आयोगाची HR ची रिक्वायमेंट आहे आपली त्यात OT चे व्यवस्थित करुन घ्या. ऑप्थॅमालॉजी व डेंटलचे युनिट तयार करुन घ्यावे. व मॅटर्निटी होम करावे. ते पुर्ण क्षमतेने चालवायचे आहे. त्यासाठी काय मनुष्यबळ लागते ते सर्व पुरवायचे. त्यात काही लागणार असेल त्या गोष्टी देखील ॲड करुन प्रोसेस करावे. HR ला देखील परवानगी याच ठरावात देणेत येत आहे. तसेच खर्चाला मान्यता देणेत येत आहे. ठराव करतांना आरोग्यअधिकारी यांचे अभिप्राय घेवुन करावा. इक्वीपमेंट संदर्भात मागील ठरावातील बाबी तपासुन घ्या आणि पुढील प्रोसेस करावी. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १९१ दिनांक १२/०९/२०२५**

धुळे महानगरपालिका हददीतील गट क्रमांक ४८९/१बी२/४८९/२ (डीपीसाईट क्रमांक २३) सीटीएस क्रमांक १००१५ या जागेवरील ऑक्युमोडेशन रिझर्व्हेशन अंतर्गत दिनांक १३ नोव्हेंबर २०२४ रोजी प्रमाणपत्र क्रमांक १०० अन्वये अभिन्यास मंजुरी घेतलेली आहे. सदर अभिन्यास हा प्रविण महाविर अग्रवाल व इतर यांच्या स्वमालकीचा आहे. सदर अभिन्यासातील डीपी साईट क्रमांक ८१ फॉर डिस्पेंसरीसाठी आरक्षीत असलेले सुमारे १३७८.५३ चौ. मीटर प्लॉट वर एकात्मिक विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली मधील Accomodation Reservation अंतर्गत डिस्पेंसरीचे बांधकाम त्यांनी स्वखर्चाने केलेले आहे. त्यासाठी सुमारे रु. ७० लक्ष रुपये खर्च करण्यात आलेला आहे. सदर दवाखाना महानगरपालिकेस हस्तांतरीत करुन ताबा पावती करण्यात आलेली आहे. सदर भाग हा अल्पउत्पन्न गटातील वस्तीचा भाग आहे. सदर भागात प्रसुतीगृह व दवाखाना होणे गरजेचे आहे. सदर दवाखान्यास माजी नगरसेविका (स्व.) विमलादेवी ओमप्रकाश अग्रवाल असे नाव

देणेबाबत सदर जागा मालकामार्फत पत्र सादर करण्यात आलेले होते.सदर डिस्पेंसरी हॉस्पीटलसाठी आवश्यक साहित्यासाठी रु.५० लक्षचा निधी जिल्हा नियोजन समिती मार्फत उपलब्ध करून देणे बाबत मा.आमदार श्री.अनुपभैय्या ओमप्रकाश अग्रवाल यांनी पत्र दिले आहे. उक्त बाबत सदर दवाखान्याचे नामकरण करणे साठी मे.महासभेची मंजुरी आवश्यक असल्याने सदरचा विषय मे.महासभेसमोर ठेवणे आवश्यक आहे.

सदर डिस्पेंसरी हॉस्पीटलसाठी आवश्यक साहित्य खरेदी करणे साठी जिल्हा नियोजन समितीमार्फत अनुदान उपलब्ध करणे कामी प्रस्ताव पाठविणेस मे.महासभेचा ठराव आवश्यक असल्याने सदरचा विषय मे.महासभेसमोर ठेवणे ठेवणे आवश्यक आहे.

तसेच सदर भागांतील नागरिकांना मॅटर्निटी होमची सुविधा नसल्याने सदर ठिकाणी तातडीने मल्टी स्पेशालिटी दवाखाना सुरु करणेस मा.आमदार श्री.अनुप भैय्या अग्रवाल यांनी सूचित केले आहे.त्यानुसार सदर ठिकाणी मल्टी स्पेशालिटी दवाखाना शुभारंभ करणेस व सदर मल्टी स्पेशालिटी दवाखान्यासाठी आवश्यक स्टाफ भरणेस मे.महासभेचा ठराव आवश्यक असल्याने सदरचा विषय मे.महासभेसमोर सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार मौजे सर्व्हे न. ४८९/१/ब१ चक्करबर्डी रोड येथे नव्याने बांधकाम झालेल्या मनपा मालकीच्या दवाखान्यास स्व. माजी नगरसेविका विमलादेवी ओमप्रकाश अग्रवाल नामकरण करणे तसेच सदर ठिकाणी प्रसुतीगृह व दवाखान्यासाठी साहित्य व उपकरणे खरेदी करणेकामी निधी उपलब्धेसाठी जिल्हा नियोजन मंडळाकडेस प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर भागातील नागरिकांची आवश्यता लक्षात घेता, सदर ठिकाणी मल्टी स्पेशालिटी दवाखाना सुरु करणेस व त्यासाठी आवश्यक तो कर्मचारी वर्ग नियुक्त करणेस मान्यता देणेत येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१९२ — प्रादेशिक पर्यटन विकास योजना २०२५-२६ अंतर्गत श्री आदीशक्ती एकविरा माता मंदिर येथे आरती घाट व श्री स्वामी समर्थ केंद्र शिवाजी रोज सुशोभिकरण करणे बाबतचा प्रस्ताव सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता — प्रादेशीक पर्यटन विकास योजना सन २०२५-२६ या योजनेअंतर्गत पांझरा नदी किनारी श्री. एकविरा माता मंदिरासमोर आरती घाट तयार करणे व सुशोभिकरण करणे रु. ५ कोटी व श्री. स्वामी समर्थ पांझरा नदीकिनारी असलेल्या केंद्राच बळकटीकरण व सुशोभिकरण करणे रु. ५ कोटी या कामाचे प्रस्ताव म. जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविण्यात मंजुरी मिळणेबाबत निर्णय घेणेसाठी सदरचा विषय मे. महासभेपुढे सादर झाला आहे. हे दोन्हीकामे मनपामार्फत करण्यात येणार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — याबाबत खातरजमा करुन घ्यावी. माजी महापौर कर्पे यांनी पर्यावरण विभागाचा प्रस्ताव दिला होता. जाईन्ट सेक्रेटरी यांच्याकडे गेला आहे. त्यांना भेटावे. तेवढा प्रस्ताव मार्गी लावावा. MIDC व डेडरगाव तलाव त्या दोन्हींचे ५-५ कोटींचे प्रपोजल मान्यतेसाठी आहे. त्याची मान्यता घ्यावी. त्याचे आचारसंहितेआधि टेंडर निघेल. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १९२ दिनांक १२/०९/२०२५**

प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०२५-२६ अंतर्गत १) पांझरा नदी किनारी श्री एकविरा माता मंदिर समोर आरतीसाठी घाट तयार करणे व सुशोभीकरण करणे रु.५.०० कोटी २) श्री स्वामी समर्थ पांझरा नदीकिनारी असलेल्या केंद्राचे बळकटीकरण व सुशोभिकरण करणे रु.५.०० कोटी या कामाचे शासन निर्णयातील निकषानुसार अंदाजपत्रक तयार करून तसेच इतर आवश्यक कागदपत्रासह प्रस्ताव म.जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणेबाबत मा.श्री.अनुपभैय्या अग्रवाल, आमदार, धुळे शहर यांनी कळविले आहे.

सदरचा प्रस्ताव तयार करून म.जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणेपूर्वी सदरचा विषय मंजुरीसाठी मे.महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०२५-२६ अंतर्गत १) पांझरा नदी किनारी श्री एकविरा माता मंदिर समोर आरतीसाठी घाट तयार करणे व सुशोभीकरण करणे रु.५.०० कोटी २) श्री स्वामी समर्थ पांझरा नदीकिनारी असलेल्या केंद्राचे बळकटीकरण व सुशोभिकरण करणे रु.५.०० कोटी मात्रचा प्रस्ताव म.जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणेस मान्यता देणेत येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**